# चाकण नगरपरिषद , चाकण

## ता. खेड, जि. पुणे पिनकोड ४१० ५०१

Website- chakanmahaulb.maharashtra.gov.in Email- chakanmc2015@gmail.com

**दूरध्वनी क्र. ०२१३५-२४९५६४ टोल फ्री क्र. १८०० २३३ १२२५**

जा.क्र. चानप/कावि-०६/२४९१/२०२२ दिनांक १७/११/२०२२

**कंत्राटी तत्त्वावरील शहर समन्वयक (City Co-ordinator) पद भरतीची जाहीर सूचना**

नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. स्वमअ-२०२२/प्र.क्र.१३०/नवि-३४ दि. ०७/११/२०२२ व मा. राज्य अभियान संचालक स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.राअस २.०/१०१६/२२-२३ दि. ०९/११/२०२२ नुसार तसेच मा. सहायक आयुक्त, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र. पसन/कावि/कार्या-२/२१३९/२०२२, दि. १५/११/२०२२ नुसार चाकण नगरपरिषदेस स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कंत्राटी तत्त्वावरील शहर समन्वयकाची (City Co-ordinator) नियुक्ती करावयाची आहे. ''शहर समन्वयक'' (City Co-ordinator) ची निव्वळ कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यांसाठी नियुक्ती करण्यासाठी खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. खालील पात्रताधारक उमेदवारांनी त्यांचे अर्ज आवश्यक कागदपत्रांसोबत दि. १८/११/२०२२ ते दि. २४/११/२०२२ पावेतो कार्यालयीन वेळेत या कार्यालयात हार्ड कॉपीमध्ये सादर करावे. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. ई-मेलद्वारे सादर केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, विहित नमुना अर्ज तसेच याबाबतच्या अटी व शर्ती नगरपरिषद कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

| पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City Co-ordinator) | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी :<br>i) बी. ई./बी. टेक. (कोणतीही शाखा)<br>ii) बी. आर्क<br>iii) बी. प्लॅनिंग<br>iv) बी. एस. सी. (कोणतीही शाखा)<br>**अनुभव :** स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे. **(स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य राहील)** | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव मर्यादा शिथिल करता येईल.) | रु. ४५,०००/- (रु. पंचेचाळीस हजार मात्र) |

पात्र उमेदवारांना मुलाखतीकरिता पाचारण करण्यात येईल. सदर प्रक्रियेत बदल अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवले आहे. याबाबत कोणतेही कारण दिले जाणार नाही.

**सही/-**

**(सुनील बल्लाळ)**

**मुख्याधिकारी**

**चाकण नगरपरिषद, चाकण**